# विटा नगरपरिषद, विटा

दुरध्वनी : ०२३४७ २७२०११ टोल फ्री : १८००११११२१
ई : मेल- covitamc@gmail.com
वेबसाईट : www.vitacity.in


जा. क्र. /२०२५ दिनांक : / /२०२५

## जाहीर प्रकटन

ज्याअर्थी खराब रस्ते व रस्त्यांवरील खड्डे यांमुळे होणारे अपघात व मृत्यू याबाबत मा.बॉम्बे उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.७१/२०१३ ची सुनावणी दि.१३/१०/२०२५ रोजी संपन्न झाली असून सदर सुनावणी दरम्यान मा.उच्च न्यायालयाने आदेश पारित केले आहेत. त्यानुसार नगरपरिषद क्षेत्रात रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी तसेच खड्यांमुळे मृत्युमुखी अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने समितीची स्थापना करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार विटा नगरपरिषद, विटा . जि.सांगली हद्दीतील नगरपरिषद मालकीचे व अखत्यारीत रस्त्यावरील खड्ड्यांमुळे मृत्युमुखी पडलेल्या अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने जनहित याचिका क्र.७१/२०१३ च्या अनुषंगाने मा.बॉम्बे उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १. | मुख्याधिकारी, विटा नगरपरिषद, विटा | सदस्य |
| २. | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,सांगली. | सदस्य |

तरी विटा नगरपरिषद, विटा . जि. सांगली हद्दीतील नगरपरिषद मालकीचे व अखत्यारीत रस्त्यावरील खड्ड्यांबाबत विटा नगरपरिषद कार्यालयात तसेच www.vitacity.in या ई-मेल आयडी वर तक्रार दाखल करता येईल.

(विक्रमसिंह पाटील)
मुख्याधिकारी
विटा नगरपरिषदविटा

Scanned with OKEN Scanner